# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर
दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६, फॅक्स क्रं.:- ०७१२-२५५७२७२
Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांक :- तंशिस/विकाना/शैवि-ईबीसी/2019/ 253
दिनांक:- 15 JAN 2019

प्रति,
प्राचार्य /संचालक,
सर्व शासकीय,खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,
नागपूर विभाग.

विषयः-महाडीबीटी पोर्टलवर संस्थांनी नोदविलेल्या शुल्कांमध्ये बदल न करणेबाबत..

संदर्भः-महाराष्ट्र शासन,उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-2018/प्र.क्र.278/तांशि-4, दि.10/01/2019

उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, शिक्षण शुल्क समितीच्या निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष 2012-13 ते 2015-16 पर्यंत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्कात व विकासात्मक शुल्कात 8 टक्के वाढ देवुन संबंधित शुल्क अभ्यासक्रम पुर्ण होईपर्यंत लागु होते. तथापी काही संस्थांनी आपले सरकार महाडीबीटी पोर्टलमध्ये नोदणी करतांनी शैक्षणिक वर्ष 2016-17 मध्ये 8 टक्के वाढ करून शुल्क नोदविण्यांत आलेले नाही.

आपले सरकार महाडीबीटी पोर्टलमध्ये संस्थांनी भरलेल्या शुल्कांची पडताळणी करतांना ब-याच संस्थांनी तत्कालीन शिक्षण शुल्क समितीच्या निर्देशाप्रमाणे शैक्षणिक शुल्क तसेच विकासात्मक शुल्क यामध्ये शुल्क वाढ घेतलेली नाही. तत्कालीन समितीने /प्राधिकरणाने निधारित केलेल्या शुल्कांपेक्षा संस्थांनी भरलेले शुल्क कमी असल्यास सदर शुल्कांस प्राधिकरणामार्फत मान्यता दर्शविण्यांत आलेली आहे. तथापि, आता अनेक संस्था त्यांनी पोर्टलवर भरलेले शुल्क कमी अथवा चुकीचे असल्याने ते प्राधिकरणाने मागे घ्यावे(Revoke)अथवा नामंजुर करावे(Reject)अशी मागणी करीत आहे.

संदर्भिय शासन निर्णयान्वये वरील वस्तुस्थिती विचारात घेता शैक्षणिक वर्ष 2018-19 मध्ये राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत संस्थेने, जरी पूर्वीच्या शिक्षण शुल्क समितीने मंजूर केल्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष 2016-17 मध्ये देय असलेली 8 टक्के वाढ विचारात घेउन महाडीबीटी पोर्टलवर शिक्षण शुल्क भरले नसल्यास त्यामध्ये कोणताही बदल करण्यास परवानगी न देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. **तथापि शिष्यवृत्तीचा दुसरा हप्ता वितरीत करण्यांपुर्वी ज्या ज्या संस्थांनी शुल्क बाबत मागणी केलेली आहे. ,अशा संस्थांनी प्रत्यक्षात विद्यार्थ्यांकडून किती शुल्क घेतले आहे. हे विभागीय तंत्रशिक्षण सहसंचालक, यांच्याकडुन तपासुन त्याप्रमाणे प्रत्यक्षात संस्थेने विद्यार्थ्याकडुन घेतलेल्या शुल्कांप्रमाणे महाडिबीटी पोर्टलवर बदल करण्यांची संधी देण्यांत येत आहे.**(शासन परीपत्रक सोबत जोडण्यांत येत आहे). त्याअनुषंगाने सदर संस्थेतील विद्यार्थ्यांनी भरलेले शिक्षण शुल्कांच्या पावत्या या कार्यालयास दि. 21/01/2019 पर्यंत सादर करण्यांत यावे. जेणे करुन महाडीबीटी पोर्टलवर सुधारित शिक्षण शुल्क दुरूस्ती करण्यांबाबत या कार्यालयामार्फत शिफारस करण्यांत येईल. तसेच तदनंतर आलेल्या प्रस्तावांचा विचार करण्यांत येणार नाही.

सहपत्रः- वरीलप्रमाणे

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपुर